मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » गुरुवार, दि. 14 मे 2026 | पान- 1


# पिंपरी-चिंचवडकरांच्या हक्काची शाळा खासगी संस्थेच्या दावणीला?

## स्थायी समितीचा खाजगीकरणाचा 'घाट' उघड; पुनावळेतील कोट्यवधींची जागा खाजगीसम्राटांच्या घशात घालण्याची तयारी!

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे यांनी घेतलेल्या एका वादग्रस्त निर्णयामुळे संपूर्ण शहरात संतापाची लाट उसळली असून यामुळे नागरिकांच्या भुवया उंचावल्या आहेत. एकीकडे महापालिका शाळांमधील पटसंख्या वाढवण्यासाठी आणि शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी प्रशासन कोट्यवधी रुपयांचा खर्च करत असताना, दुसरीकडे मात्र हक्काच्या आरक्षित जमिनी खाजगी संस्थांच्या घशात घालण्याचा घाट घातला जात असल्याचे समोर आले आहे. आज पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये स्थायी समितीची बैठक पार पडली.



यामध्ये पुनावळे येथील मौजे पुनावळे येथील सर्व्हे नंबर ३८ व ४४ मधील ९१ गुंठे (९१०० चौ.मी.) इतकी प्रशस्त जागा, जी माध्यमिक शाळेसाठी आरक्षित आहे, ती चक्क 'ईस्ट ऑक्सफर्ड इंटरनॅशनल फाउंडेशन' या संस्थेला ३० वर्षांच्या दीर्घ मुदतीसाठी भाड्याने देण्याचा घाट घातला जात आहे. विशेष म्हणजे, ज्या जमिनीचे बाजारमूल्य शेकडो कोटींच्या घरात आहे, ती जागा केवळ ७ कोटींच्या रकमेवर ३० वर्षांसाठी आंदण देण्याची शिफारस करण्यात आली आहे.

स्थायी समितीच्या या निर्णयावर आता गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. जर महापालिका स्वतःच्या शाळा चालवण्यासाठी सक्षम आहे आणि त्यावर करदात्यांचे कोट्यवधी रुपये खर्च करत आहे, तर मग मोक्याच्या ठिकाणच्या जमिनी खाजगी संस्थांना कशासाठी दिल्या जात आहेत? हा 'खाजगीकरणाचा घाट' नक्की कोणाच्या हितासाठी घातला जात आहे, असा थेट सवाल आता शहरवासीय विचारत आहेत.

निविदा क्र. १/२०२५-२०२६ अन्वेय मागवलेल्या या प्रक्रियेत केवळ तीनच निविदा प्राप्त होणे आणि त्यातून एका खाजगी फाउंडेशनची निवड होणे, यावरून या संपूर्ण प्रक्रियेत संशयास्पद हालचाली झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७९ (क) नुसार ही शिफारस महापालिका सभेकडे धाडण्यात आली असली, तरी सामान्य जनतेच्या पैशातून उभारलेल्या मालमत्तांचे असे 'लिलाव' म्हणजे शिक्षण क्षेत्रातील व्यापारीकरण असल्याची टीका होत आहे. एकीकडे सरकारी शाळा वाचवण्याची भाषा करायची आणि दुसरीकडे शाळांची आरक्षणे खाजगी शिक्षणसम्राटांना तुटपुंज्या मोबदल्यावर बहाल करायची, हा दुटप्पीपणा स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे यांना महागात पडण्याची शक्यता आहे.

### विरोधकांचे चिडीचूप की मूक संमती?

» एरवी लहान मोठ्या कारणानेही सभागृहाचा त्याग करणारे गोंधळ घालणारे विरोधक मात्र एवढ्या गंभीर निर्णयावर चिडूचूप होते. याला मूक संमती समजावी का? तसेच यावरून विरोधकांचाही याला पाठिंबा आहे का? असा थेट सवाल नागरिक आता विचारत आहेत.



# काळेवाडीत वृद्ध महिलेचा पाय पाईपमध्ये अडकला; अग्निशमन दलाच्या जवानांनी केली महिलेची सुखरूप सुटका

## जवानांच्या प्रसंगावधान, संयम आणि अत्याधुनिक उपकरणांच्या मदतीने ही मोहीम यशस्वी ठरली.

**पिंपरी | प्रतिनिधी**

काळेवाडीतील पाचपीर चौक परिसरात पाईपलाईनमध्ये पाय अडकून गंभीर परिस्थितीत अडकलेल्या ६५ वर्षीय वृद्ध महिलेची पिंपरी-चिंचवड अग्निशमन दलाने तब्बल दोन तासांच्या थरारक बचाव मोहिमेनंतर सुखरूप सुटका केली. जवानांच्या प्रसंगावधान, संयम आणि अत्याधुनिक उपकरणांच्या मदतीने ही मोहीम यशस्वी ठरली.



स्मिता भागवत कासारे असे सुटका करण्यात आलेल्या महिलेचे नाव असून, दुपारच्या सुमारास त्यांचा पाय पाणीपुरवठा व्हॉल्व्हसाठी असलेल्या सुमारे २०० मिमी रुंदीच्या आणि पाच फूट खोल पीव्हीसी पाईपमध्ये गुडघ्यापर्यंत अडकला होता. पाय आतमध्ये वळल्यामुळे त्यांना हालचाल करणे अशक्य झाले होते. घटनेची माहिती मिळताच मुख्य अग्निशमन केंद्राचे बचाव पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले.

अग्निशमन दलाच्या जवानांनी सर्वप्रथम पाईपच्या सभोवतालची जमीन अत्यंत काळजीपूर्वक खोदण्यास सुरुवात केली. यावेळी परिसरातील गॅस पाईपलाईन व विद्युत केबल्सना कोणतीही हानी पोहोचू नये यासाठी विशेष खबरदारी घेण्यात आली. बचाव मोहिमेत बॅटरी ऑपरेटेड ग्राइंडर कटर, हायड्रॉलिक कटर तसेच पेट्रोल इंजिन ऑपरेटेड कटरसारख्या अत्याधुनिक उपकरणांचा वापर करण्यात आला.

सुमारे दोन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर अखेर अग्निशमन दलाच्या जवानांनी महिलेचा पाय सुरक्षितरीत्या बाहेर काढण्यात यश मिळवले. विशेष म्हणजे, या संपूर्ण घटनेत महिलेला कोणतीही गंभीर दुखापत झाली नाही. वृद्ध महिलेची सुखरूप सुटका होताच उपस्थित नागरिकांनी टाळ्यांच्या गजरात अग्निशमन दलाच्या जवानांचे कौतुक करत आभार व्यक्त केले.

# धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त 'स्टॅच्यु ऑफ हिंदुभूषण' येथे भव्य प्रकाशोत्सव

## दोन दिवस चालणार ऐतिहासिक लाईट शो, शस्त्र प्रदर्शन; हिंदूभूषण स्मारक ट्रस्टच्या पुढाकाराने अनोखे अभिवादन

**पिंपरी | प्रतिनिधी**

धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त बोऱ्हाडेवाडी-मोशी येथील स्टॅच्यु ऑफ हिंदुभूषण येथे हिंदुभूषण स्मारक ट्रस्टच्या वतीने भव्य दिव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार दि. १४ मे व शुक्रवार दि. १५ मे २०२६ या दोन दिवसांत होणाऱ्या या विशेष सोहळ्यात हिंदुस्थानच्या इतिहासातील एकमेवाद्वितीय लाईट शो, आकर्षक विद्युत रोषणाई आणि शिवकालीन वैभवाचे दर्शन घडविणारे विविध उपक्रम सादर करण्यात येणार आहेत.

सायंकाळी ७ ते रात्री १० या वेळेत होणाऱ्या विशेष लाईट शोमध्ये धर्मवीर शंभूराजेंच्या पराक्रमाचा, त्यागाचा आणि स्वराज्यासाठी दिलेल्या बलिदानाचा इतिहास आधुनिक प्रकाशयोजना, ध्वनी आणि दृश्य माध्यमांच्या सहाय्याने साकारण्यात येणार आहे. संपूर्ण परिसरात आकर्षक विद्युत




रोषणाई करण्यात येणार असून, 'स्टॅच्यु ऑफ हिंदुभूषण' परिसर भगव्या प्रकाशाने उजळून निघणार आहे. शिवप्रेमींसाठी हा सोहळा विशेष आकर्षण ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

हिंदुभूषण स्मारक ट्रस्टतर्फे "धर्मवीर शंभूराजेंना अनोखी मानवंदना" या संकल्पनेवर आधारित हा कार्यक्रम इतिहासात पहिल्यांदाच आयोजित करण्यात येत असल्याचा दावा करण्यात आला आहे. छत्रपती संभाजी महाराजांचे शौर्य, धर्मरक्षणासाठी दिलेले बलिदान आणि हिंदवी स्वराज्याच्या रक्षणासाठी त्यांनी केलेले संघर्ष यांची माहिती नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, पिंपरी चिंचवडसह पुणे परिसरातील हजारो शिवप्रेमी या सोहळ्यास उपस्थित राहतील, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. नागरिकांनी कुटुंबासह उपस्थित राहून धर्मवीर शंभूराजेंच्या तेजस्वी इतिहासाचा जागर करावा, असे आवाहन हिंदुभूषण स्मारक ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

### धर्मवीर संभाजी महाराजांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक

» गुरुवार दि. १४ मे रोजी सकाळी ठिक ८ वाजता धर्मवीर संभाजी महाराजांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक व विधिवत पूजाअर्चा करण्यात येणार आहे. यावेळी विविध धार्मिक विधी, मंत्रोच्चार आणि पारंपरिक पद्धतीने अभिषेक सोहळा पार पडणार आहे. शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाराजांना अभिवादन करणार आहेत. तसेच सकाळी १० ते सायंकाळी ७ या वेळेत भव्य दिव्य ऐतिहासिक शिवकालीन शस्त्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनामध्ये तलवारी, ढाली, भाले, कट्यारी, तोफा तसेच शिवकालीन युद्धसामग्रीचे विविध प्रकार नागरिकांना पाहायला मिळणार आहेत. शिवकालीन युद्धकला, शस्त्रांचे महत्त्व आणि मराठा साम्राज्याच्या लढाऊ परंपरेची माहिती देखील या प्रदर्शनातून दिली जाणार आहे. इतिहास अभ्यासक, शिवव्याख्याते आणि तरुण पिढीसाठी हे प्रदर्शन विशेष आकर्षण ठरणार आहे.

> "धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचे शौर्य, त्याग आणि धर्मरक्षणासाठीचे बलिदान हे संपूर्ण हिंदुस्थानासाठी प्रेरणादायी आहे. नव्या पिढीला शंभूराजेंचा तेजस्वी इतिहास समजावा आणि स्वराज्याच्या विचारांची प्रेरणा मिळावी, या उद्देशाने 'स्टॅच्यु ऑफ हिंदुभूषण' येथे भव्य लाईट शो, विद्युत रोषणाई आणि शिवकालीन शस्त्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. शिवप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून धर्मवीर शंभूराजेंना अभिवादन करावे,"
>
> - महेश लांडगे, अध्यक्ष, हिंदू भूषण स्मारक ट्रस्ट..

# महापौर रवि लांडगे यांच्या परदेश दौऱ्याची मान्यता

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानंतर महापौर कोणता निर्णय घेणार?

**पिंपरी | प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशहितासाठी काटकसर करा असं म्हणत परदेश वाऱ्या टाळण्याचं आवाहन केलं आणि त्यानंतर काही तासांतच महाराष्ट्र शासनाने पिंपरी चिंचवडच्या महापौरांना परदेश दौऱ्याची मान्यता दिली आहे. केंद्रात, राज्यात आणि पिंपरी चिंचवड महापालिकेत भाजपची सत्ता आहे, तरी सुद्धा महाराष्ट्र शासनाने पंतप्रधान मोदींचं आवाहनाला छेद दिला आहे. आता महापौर रवि लांडगे हे पंतप्रधानांच्या आवाहनानुसार देशहितासाठी हा परदेश दौरा रद्द करणार का? याकडे सर्वांचं लक्ष लागलेलं आहे



संयुक्त राष्ट्रांच्या UN-HABITAT संस्थेचे वर्ल्ड अर्बन फोरम हे तेरावे अधिवेशन आहे. यामध्ये शहरी विकास विषयक जागतिक परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे. बाकु अझरबैजान येथे पार पडणाऱ्या या परिषदेला रवि लांडगे आणि त्यांचे स्वीय सहाय्यक अभय चौगुले उपस्थित राहणार आहेत. 17 मे ते 22 मे दरम्यान हे जागतिक अधिवेशन पार पडणार असून पिंपरी पालिकेच्या स्थायी समितीने या दौऱ्यासाठी निधी ही मंजूर केला आहे.

या दौऱ्यावर 8 लाख 80 हजार 281 रुपयांची उधळपट्टी केली जाणार आहे. पंतप्रधान मोदींनी 10 मे ला देशहितासाठी जनतेला आवाहन केलं. काटकसर करण्यावर भर द्या, असं आवर्जून सांगितलं. पण दुसऱ्याच दिवशी म्हणजे 11 मे ला भाजपचं सरकार असलेल्या महाराष्ट्र शासनाने महापौरांच्या परदेश दौऱ्याला मान्यता देत पंतप्रधानांच्या आवाहनाला छेद दिला आहे. आता पिंपरी चिंचवडचे महापौर रवि लांडगे देशहितासाठी हा परदेश दौरा रद्द करणार का? शहराचे प्रथम नागरिक असलेले रवि लांडगे याबाबत काय निर्णय घेतात? याकडे पिंपरी चिंचवड शहरवासीयांचं लक्ष लागून आहे.

### महापौर परदेश दौऱ्यावर ठाम, पण...

» पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशहितासाठी काटकसर करण्याचं आवाहन केलंय, त्यानंतर ही महापौर रवि लांडगे परदेश दौऱ्यावर ठाम आहेत. मी फिरायला नव्हे तर विकासाच्या दृष्टीने होणाऱ्या जागतिक अधिवेशनासाठी अझरबैजानला निघालोय, असं म्हणत लांडगेंनी परदेश दौऱ्यावर जाणार असल्याचं म्हटलंय. केंद्रात, राज्यात आणि पिंपरी चिंचवड मध्ये ही भाजपची सत्ता असताना महापौरांनी ही भूमिका घेतल्यानं आश्चर्य व्यक्त केलं जातंय. अशातच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व मंत्र्यांना परदेश दौरे रद्द करण्याचे आदेश दिलेत, हा आदेश अभ्यास दौऱ्यांच्या अनुषंगाने असेल तर मी सुद्धा माझा हा परदेश दौरा रद्द करेन. असं महापौर लांडगेंनी म्हटलंय. लांडगे हे 17 मे ला अझरबैजानला दौऱ्यावर जाणार आहेत, तत्पूर्वी ते हा दौरा रद्द करतात की दौऱ्यावर ठाम राहतात? याकडे सर्वांचं लक्ष लागून आहे.

# पुण्यात होर्डिंग दरात मोठी वाढ; प्रति चौ.फुट 750 रुपयांपर्यंत प्रस्ताव

## महापालिकेच्या नव्या धोरणातून जाहिरात महसूल वाढवण्यावर भर; सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर थकबाकी वसुलीचा मार्ग मोकळा

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील अधिकृत होर्डिंगच्या नव्या दरनिर्धारणाची प्रक्रिया महापालिकेने हाती घेतली आहे. विद्यमान दरांमुळे महापालिकेचे मोठे आर्थिक नुकसान होत असल्यामुळे दरात मोठी वाढ करण्याचा प्रस्ताव सध्या विचाराधीन आहे. सध्या काही जाहिरात क्षेत्रातील घटकांकडून प्रतिचौरस फूट 350 रुपये दर निश्चित करण्याची मागणी करण्यात येत असली, तरी प्रशासनाच्या स्तरावर 700 ते 750 रुपये दर निश्चित करण्याबाबत विचाराधीन आहे, अशी माहिती आयुक्त नवल किशोर राम यांनी दिली

शहरातील वाढती जाहिरात क्षमता, प्रमुख रस्त्यांवरील व्यावसायिक महत्त्व आणि डिजिटल होर्डिंगच्या वाढत्या वापराच्या पार्श्वभूमीवर विद्यमान दर अत्यंत कमी असल्याचे प्रशासनाचे मत आहे. त्यामुळे नव्या धोरणातून महसूलवाढीसोबतच होर्डिंग व्यवस्थापन अधिक शिस्तबद्ध करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

दरम्यान, मुंबई महापालिकेच्या होर्डिंग धोरणाचा दाखला देत आयुक्त नवल किशोर राम यांनी महसुलातील तफावत अधोरेखित केली. मुंबई महापालिकेला होर्डिंगमधून एका दिवसात मिळणारे उत्पन्न हे पुणे महापालिकेच्या वर्षभराच्या उत्पन्नाइतके असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यामुळे पुण्यासाठी नवीन होर्डिंग धोरण तयार करताना महसूलवाढ हा महत्त्वाचा मुद्दा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये उच्च न्यायालयाने महापालिकेच्या बाजूने निकाल दिला. त्याविरोधात व्यावसायिकांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवत शुल्क वाढीस स्थगिती देण्यास नकार दिला. त्यामुळे महापालिकेचा होर्डिंगच्या थकबाकी वसुलीचा मार्ग मोकळा झाला आहे.




### थकबाकी वसुलीचा मार्ग मोकळा

» महापालिकेने 2013 मध्ये शहरातील जाहिरात फलकांसाठी प्रतिचौरस फूट 222 रुपये दर निश्चित केला होता. या दराविरोधात 2018 मध्ये होर्डिंग व्यावसायिक उच्च न्यायालयात गेले होते. महापालिकेने न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करताना, 2013 मध्ये निश्चित करण्यात आलेला 222 रुपयांचा दर आणि दरवर्षी 10 टक्के वाढीच्या सूत्रानुसार 2023 मध्ये भाडेदर 580 रुपये निश्चित करण्यात आल्याचे स्पष्ट केले होते. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये उच्च न्यायालयाने महापालिकेच्या बाजूने निकाल दिला. त्याविरोधात व्यावसायिकांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवत शुल्क वाढीस स्थगिती देण्यास नकार दिला. त्यामुळे महापालिकेचा होर्डिंगच्या थकबाकी वसुलीचा मार्ग मोकळा झाला आहे.

### महापालिकेच्या होर्डिंग दरवाढीची तयारी

» पुणे महापालिकेने शहरातील अधिकृत होर्डिंगच्या नव्या दरनिर्धारणाची प्रक्रिया सुरू केली असून, विद्यमान दरांमुळे महसुलात मोठे नुकसान होत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. जाहिरात क्षेत्रातील काही घटकांकडून प्रतिचौरस फूट ३५० रुपये दराची मागणी होत असली तरी प्रशासनाच्या स्तरावर ७०० ते ७५० रुपये दर निश्चित करण्याचा विचार सुरू आहे. शहरातील वाढती जाहिरात क्षमता, प्रमुख रस्त्यांवरील व्यावसायिक महत्त्व आणि डिजिटल होर्डिंगच्या वाढत्या वापरामुळे विद्यमान दर कमी असल्याचे मत व्यक्त करण्यात आले आहे.

> “सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर आम्ही शुल्क निश्चिती करणार आहोत, हे काम अंतिम टप्प्यात आले आहे. महापालिकेचे उत्पन्न वाढविणे आवश्यक आहे. मुंबई महापालिकेत पुण्यापेक्षा 10 पट जास्त इतके उत्पन्न मिळते. तेथील शुल्क ही खूप जास्त आहे. त्यातुलनेत पुणे महापालिकेचे शुल्क खूप कमी आहे. काही जण होर्डिंगचे शुल्क प्रतिचौरस फूट 350 रुपये असावे, अशी मागणी करत आहेत. पण हे शुल्क 700 ते 750 रुपये प्रतिचौरस फूट असू शकते. त्यावर अंतिम निर्णय महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत घेतला जाईल.
>
> - नवल किशोर राम, आयुक्त महापालिका

# भिडेवाडा राष्ट्रीय स्मारकाचे काम येत्या वर्षभरात पूर्ण करणार : मंत्री अतुल सावे

## महात्मा ज्योतिबा फुले यांच्या 200 व्या जयंतीनिमित्त राज्य शासनाकडून विविध उपक्रमाचे आयोजन करण्याचा निर्णय घेतला आहे,

**पुणे | प्रतिनिधी**

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त राज्य शासनाकडून विविध उपक्रमाचे आयोजन करण्याचा निर्णय घेतला आहे, याच पार्श्वभूमीवर भिडेवाडा राष्ट्रीय स्मारकाचे काम येत्या वर्षभरात पूर्ण करण्यात येईल, असे प्रतिपादन राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी केले.

मंत्री सावे यांनी आज भिडेवाडा राष्ट्रीय स्मारकाच्या कामाची पाहणी केली, यावेळी ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रजित नायर, अधीक्षक अभियंता बिपिन शिंदे, निलेश गिरमे, भिडेवाडा राष्ट्रीय स्मारक समितीचे अध्यक्ष अजय खेडेकर, पीएमपीएलचे अध्यक्ष तथा नगरसेवक प्रशांत डोके आदी पदाधिकारी उपस्थित होते.

मंत्री सावे म्हणाले, क्रांतीसूर्य महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची माहिती नागरिकांना व्हावी, याकरिता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासमवेत चर्चा करुन भिडेवाडा राष्ट्रीय स्मारकाचा विकास करण्यासाठी प्रयत्न करुन कामाची सुरुवात करण्यात आली होती. सद्यस्थितीत पुणे महानगरपालिकेच्या माध्यमातून स्मारकाचे काम वेगाने सुरू असून सध्याची ९० टक्के काम पूर्ण झाले आहे, या कामाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त करत उर्वरित विकास कामे गतीने पूर्ण करण्याच्या सूचना यावेळी मंत्री सावे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

यावेळी नायर यांनी पुणे महानगरपालिकेच्या वतीने भिडेवाडा राष्ट्रीय स्मारक विकास आराखड्याच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या कामांबाबत माहिती दिली.



### इमारतीची वैशिष्ट्ये आणि सुविधा...

» स्मारकामध्ये सावित्रीबाई फुले आणि महात्मा फुले यांच्या जीवनावर आधारित विविध आधुनिक सुविधा असणार असून यामध्ये ऑडिओ-व्हिडिओ शो, दोन्ही महापुरुषांच्या जीवनचरित्रावर आधारित 'थीम बेस्ड' ऑडिओ-व्हिडिओ शो आणि होलोग्राफीचे काम करण्यात येणार आहे. या दोन्ही महापुरुषांचे अर्धपुतळे आणि त्यांच्या कार्याची माहिती प्रदर्शित केली जाणार आहे. मुली आणि महिलांसाठी कौशल्य विकास केंद्र, मार्गदर्शन केंद्र आणि संगणक केंद्र उभारले जाणार आहे. स्मारकात एक ॲम्फीथिएटर देखील असणार आहे.

# बारामती विमानतळाजवळ पुन्हा अपघात, प्रशिक्षणार्थी विमान कोसळले; वैमानिक सुखरूप

## प्रशिक्षणार्थी विमानाला भीषण अपघात झाला, उड्डाण केल्यानंतर काही वेळातच तांत्रिक बिघाडामुळे हे विमान शेतात कोसळले.

**पुणे | प्रतिनिधी**

रेडबर्ड कंपनीचे एक प्रशिक्षण विमान बुधवारी सकाळी प्रशिक्षण सत्रादरम्यान तांत्रिक बिघाड झाल्यामुळे बारामती येथे आपत्कालीन उतरवण्यात आले (इमर्जन्सी लँडिंग करण्यात आले). प्राथमिक माहितीनुसार, सकाळी ८:४० च्या सुमारास गोजुबावी गावाजवळ प्रशिक्षणार्थी वैमानिकाच्या (पायलट) विमानाला अडचण आली. एएनआयने

पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक (SP) संदीप सिंह गिल म्हणाले, “आज सकाळी सुमारे ८:५० वाजता, रेड बर्ड एव्हिएशनचे एक प्रशिक्षण विमान बारामती विमानतळाजवळील गोजुबावी गावाजवळ कोसळले (क्रॅश लँडिंग झाले). घटनास्थळी उपस्थित असलेल्या प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, कमी उंचीवरून उडत असताना विमानात तांत्रिक बिघाड झाला होता. क्रॅश लँडिंग दरम्यान, विमान जमिनीवर कोसळण्यापूर्वी त्याचा एक भाग विजेच्या खांबाला धडकला. विमानामध्ये फक्त एकच प्रशिक्षणार्थी पायलट (पायलट ट्रेनी) होता. सुदैवाने, पायलटला कोणतीही गंभीर दुखापत झालेली नाही. घटनेची माहिती मिळताच पोलीस कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले असून, आवश्यक चौकशी आणि पुढील कारवाई सुरू आहे. अधिक तपशील मिळाल्यानंतर सामायिक केले जातील

विमान हवेत असतानाच समस्या निर्माण झाली असूनही, प्रशिक्षणार्थी पायलटने शेजारील एका उसाच्या शेतात विमानाचे सुरक्षित लँडिंग केले. या आपत्कालीन लँडिंगमुळे मोठा अपघात टळला आणि जमिनीवर असलेल्या कोणत्याही व्यक्तीला इजा झाली नाही. या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा दुखापत झाल्याचे वृत्त नाही. मात्र, आपत्कालीन लँडिंगनंतर प्रशिक्षणार्थी पायलट मानसिक धक्क्यामध्ये (शॉक) असल्याचे सांगण्यात आले असल्याचे दिले आहे.

विमान उतरताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळाकडे धाव घेतली. पोलीस कर्मचारी आणि प्रशासकीय अधिकारीही परिसरात पोहोचले असून त्यांनी घटनेचा तपास सुरू केला आहे. आपत्कालीन लँडिंगला कारणीभूत ठरलेल्या तांत्रिक बिघाडाचे नेमके कारण शोधण्याचा प्रयत्न आता अधिकारी करत आहेत.



### विमानाची आपत्कालीन लँडिंग

**» संदीप सिंह गिल यांनी दिलेल्या माहितीनुसार, रेडबर्ड एव्हिएशनचे प्रशिक्षण विमान बुधवारी सकाळी बारामती विमानतळाजवळील गोजुबावी परिसरात तांत्रिक बिघाडामुळे आपत्कालीन उतरवावे लागले. कमी उंचीवर उड्डाण करत असताना विमानात अचानक समस्या निर्माण झाली होती. क्रॅश लँडिंगदरम्यान विमानाचा एक भाग विजेच्या खांबाला धडकला. विमानात फक्त प्रशिक्षणार्थी पायलट होता आणि सुदैवाने त्याला कोणतीही गंभीर दुखापत झाली नाही. घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि प्रशासन घटनास्थळी दाखल झाले असून तपास सुरू करण्यात आला आहे.**

### नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**» बारामती परिसरात घडलेल्या या घटनेमुळे काही काळ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. विमान उसाच्या शेतात उतरल्यामुळे आसपासच्या भागातील कोणतीही जीवितहानी टळली. घटनास्थळी पोलीस, प्रशासन आणि स्थानिक नागरिकांनी तातडीने मदतकार्य सुरू केले. अधिकाऱ्यांनी विमानाची पाहणी करून पुढील चौकशी सुरू केली आहे. प्रशिक्षण विमानांच्या सुरक्षेबाबत आणि तांत्रिक तपासणी प्रक्रियेबाबतही या घटनेनंतर प्रश्न उपस्थित होत आहेत. दुर्घटना टळल्यामुळे स्थानिकांनी समाधान व्यक्त केले असून पायलटच्या प्रसंगावधानाचे कौतुक केले जात आहे.**

### तांत्रिक तपासणी सुरू

**» रेडबर्ड एव्हिएशन कंपनीचे हे प्रशिक्षण विमान नियमित प्रशिक्षण सत्रासाठी उड्डाण करत होते. सकाळी सुमारे ८:४० वाजता हवेत असतानाच विमानात तांत्रिक बिघाड निर्माण झाला. मात्र, प्रशिक्षणार्थी पायलटने प्रसंगावधान राखत शेजारील उसाच्या शेतात सुरक्षित लँडिंग केले. त्यामुळे संभाव्य मोठी दुर्घटना टळली. विमान उतरल्याची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली. आपत्कालीन लँडिंगनंतर पायलट मानसिक धक्क्यात असल्याचे सांगितले जात आहे. विमानातील बिघाडाचे नेमके कारण शोधण्यासाठी तांत्रिक तपासणी सुरू करण्यात आली आहे.**

# बिबवेवाडीत अग्नीतांडव! 8 हजार चौरस फुटांचे गोडाऊन खाक; 7 दुचाकींसह टेम्पो जळून भस्मसात

## अग्निशमन दलाची 7 वाहने आणि महापालिकेच्या 11 टँकर्सच्या मदतीने आगीवर नियंत्रण; परिसरातील दुकाने बचावली.

**पुणे | प्रतिनिधी**

बिबवेवाडीत अप्पर डेपोजवळ ८ हजार चौरस फुटांच्या मंडप साहित्याच्या गोडाऊनला बुधवारी (दि.१२) दुपारी भीषण आग लागली. आगीत गोडाऊनमधील सर्व साहित्य तसेच आवारातील सात दुचाकी, एक टेम्पो भस्मसात झाला. अग्निशमन दलाच्या जवानांनी धाव घेत बचावकार्य केले. सुदैवाने, आगीत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

बिबवेवाडीतील सर्व्हे नं. ६५८, अप्पर डेपो येथे काळे अँड सन्स हे मंडप साहित्याचे गोडाऊन आहे. दुपारी १ वाजून २३ मिनिटांच्या सुमारास अचानक गोडाऊनला आग लागली. आत कापड, कार्पेट, प्लास्टिक आणि लाकडी सजावटीचे साहित्य मोठ्या प्रमाणात असल्याने काही क्षणांतच आगीने रौद्र रूप धारण केले. आगीचे, धुराचे लोट परिसरात लांबून दिसत होते.

यामुळे परिसरात घबराटीचे वातावरण निर्माण झाले. आगीत गोडाऊनमधील सर्व साहित्य जळून खाक झाले. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाची पथके तातडीने घटनास्थळी आली. दाट नागरी वस्ती आणि शेजारीच असलेल्या दुकानांमुळे आग पसरून मोठे नुकसान होण्याचा धोका होता. जवानांनी चारही बाजूंनी पाण्याचा मारा करून आगीवर नियंत्रण मिळविले.

मोहिमेत ७ अग्निशमन वाहने, महापालिकेचे ११ टँकर आणि पुणे कॅन्टोन्मेंटचे एक वाहन अशा मोठ्या यंत्रणेसह ५० जवानांनी भाग घेतला. मुख्य अग्निशमन अधिकारी देवेंद्र पोटफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी विजय मिलारे, समीर शेख, सुनील नाईकनवरे व कैलास शिंदे यांनी ही आग आटोक्यात आणली. स्थानिक नागरिक, पोलीस आणि महावितरण कर्मचाऱ्यांनीही आग विझवण्यासाठी मोलाचे सहकार्य केले.




> **“आगीची भीषणता पाहता आम्ही तत्काळ अतिरिक्त कुमक रवाना केली. आजूबाजूला मोठी नागरी वस्ती सल्याने आग पसरू न देणे हे आमच्यापुढील मुख्य आव्हान होते. जवानांच्या सतर्कतेमुळे आग मर्यादित राहिली आणि मोठी हानी टळली.”**
>
> **- देवेंद्र पोटफोडे, मुख्य अग्निशमन अधिकारी..**